जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८६५ दिनांक - १३/१२/२०२३**

समर्थ पोलीस स्टेशन,पुणे शहर

# तडीपार केलेल्या सराईत गुन्हेगारास ठोकल्या बेडया

समर्थ पोलीस ठाणेकडील तपास पथकातील अधिकारी पोलीस अमंलदार समर्थ पोलीस स्टेशनच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना, पोलीस अंमलदार हेमंत पेरणे यांना त्यांच्या गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, समर्थ पोलीस स्टेंशनकडील तडीपार गुन्हेगार दिपक सुभेदार परदेशी वय २३ वर्ष, रा. सदाआनंदनगर, मंगळवार पेठ पुणे. हा के. ई. एम्. हॉस्पिटल समोरील बाजुस एस.व्ही. युनियन गेट शेजारी, सोमवार पेठ पुणे येथे बसलेला आहे. लागलीच सदरची माहीती त्यांनी वरिष्ठांना कळवून त्याला स्टाफच्या मदतीने सापळा रचून ताब्यात घेतले. त्यास परवानगी बाबत विचारणा केली असता, त्याने पुणे जिल्हयात येण्याकरिता कोणत्याही प्रकारची परवानगी घेतली नसल्याचे समजले. त्यामूळे सदर गुन्हेगाराने पोलीस उपायुक्त सो परिमंडळ १ यांचा आदेश क्रमांक १४/२०२३ नूसार पोलीस आयुक्तालय पुणे शहर व संपूर्ण पुणे जिल्हा हद्दीतून तडीपार केलेले असताना देखील त्याने आदेशाचा भंग केला म्हणून सदर गुन्हेगार दिपक परदेशी यांस अटक करुन समर्थ पोलीस स्टेशन येथे गु. र. नं २६७/२०२३ महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हेगारावर यापुर्वी खुनाचा प्रयत्न, खंडणी मागणे, बेकादेशीर हत्यार बाळगणे, असे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशीक विभाग, पुणे शहर श्री.प्रविण पाटील मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ पुणे शहर, श्री संदीप गिल्ल, मा.सहाय्यक पोलीस आयुंक्त, फरासखाना विभाग, पुणे श्री. अशोक धुमाळ, समर्थ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री. सूरज बंडगर, पोलीस निरीक्षक, (गुन्हे) श्री.प्रमोद वाघमारे, यांचे मार्गदर्शनानुसार पोलीस उपनिरीक्षक सौरभ थोरवे, सुनिल रणदिवे, सहा.पोलीस फौज. दत्तात्रय भोसले,पोलीस अंमलदार हेमंत पेरणे,संताष डमाळे,गणेश वायकर, प्रमोद जगताप, रोहीदास वाघेरे, रहीम शेख, अमोल शिंदे, शरद घोरपडे यांनी केलेली आहे.


समर्थ पोलीस स्टेशन
फोन नं.
२६०६५४९१/२६२०८२२४.